 ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

# नागरिकत्व दुरुस्ती कायदा २०१९आणि त्याचे वास्तव

**किर्ती विजय करंजावणे**

**सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र,**

**अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर,पुणे**

**मागील काही दिवसांपासून देशातील राजकारण चांगलेच तापलेले दिसत आहे. त्याला कारण म्हणजे भारतीय संसदेमध्ये नागरिकत्व दुरुस्ती कायदा**(The Citizenship Amendment Act,2019-CAA) **पास करण्यात आला. हा कायदा १९५५ च्या नागरिकत्व कायद्यात एका मर्यादित अर्थाने बदल करणारा आहे. हा कायदा मंजूर करून घेतल्यानंतर देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी यानंतर राष्ट्रीय नागरिक नोंदणी**(National Register of Citizenship- NRC) **ही प्रक्रिया संपूर्ण देशात राबविली जाणार असल्याचे स्पष्ट केले आणि संपूर्ण देशात विशेषतः ईशान्य भारतात या कायद्याच्या विरोधात भडका उडाला. या** CAA **कायद्याच्याआणि** NRC **च्या विरोधात संपूर्ण देशात विद्यार्थी, राजकीय नेते, सामाजिक-राजकीय विचारवंत,कार्यकर्ते, लेखक, संस्था-संघटना आदींनी रस्त्यावर उतरून आंदोलने करण्यास सुरवात केली. भारतातील नागरिकत्व सुधारणा कायदा हा स्थलांतरीतांच्या अधिकाराशी आणि भवितव्याशी जोडला गेला आहे त्याच प्रमाणे तो भारताच्या आजपर्यंतच्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला, समानतेच्या तत्वाला छेद देणारा आहे. जगामध्ये स्थलांतर करणाऱ्यांची संख्या मोठी आहे या स्थलांतराची कारणे अर्थातच वेगवेगळी असू शकतात उदा: उपजीविकेची साधने मिळवण्यासाठी, राजकीय अन्यायामुळे, धार्मिक भेदभावामुळे त्याचप्रमाणे देशातील राजकीय अस्थिरता आणि युद्ध या कारणांमुळे स्थलांतर होताना दिसते. भारतदेखील त्याला अपवाद नाही. भारताची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली. फाळणीच्या काळात लक्षावधी मुस्लिमांनी पाकिस्तानात तर हिंदुनी भारतात स्थलांतर केले होते आणि तेवढ्याच प्रमाणात बंगाल मधूनदेखील वेगवेगळ्या कालखंडात तेवढ्याच प्रमाणात तेथील जनतेने भारतात स्थलांतर केल्याचे दिसून येते. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशामध्ये झालेल्या हिंसाचाराला थांबवण्यासाठी आणि स्थलांतरीतांना त्यांचे अधिकार देण्यासाठी८ एप्रिल १९५० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान लियाकत अली खान यांच्यामध्ये करार झाला. या करारानुसार उभय देशातील अल्पसंख्याकांचे अधिकार निश्चित केले होते; पण पूर्व बंगालमधून हिंदूंचे स्थलांतर होत राहिले. १९७१ च्या बांगलादेशाच्या स्वातंत्र्ययुद्धात तर लक्षावधी लोक भारतात आले त्यात हिंदू, मुस्लीम या दोन्ही धर्माचे लोक होते त्यामुळे अर्थातच एवढ्या मोठ्या प्रमाणात आलेल्या निर्वासितांचाप्रश्न कसा सोडवायचा व त्यांची सोय कशी करायची हा प्रश्न स्वतंत्र भारत सरकारपुढे होता. यातील हिंदू व शीख निर्वासितांचे पुनर्वसन भारत सरकारने वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले मुख्य प्रश्न मात्र बांगलादेशातील निर्वासितांचा होता आणि आजही आहेबांगलादेशातील निर्वासित आज मुख्यतः आसाम आणि पश्चिम बंगाल या राज्यात मोठ्या प्रमाणात आहेत; आणि म्हणून या कायद्याला विरोधाचे प्रमाण या भागात जास्त दिसून येत आहे. काळानुसार संविधानामध्ये बदल होणे आवश्यक असते मात्र हा बदल करत असताना घटनात्मक व मुलभूत मूल्याचा गाभा अबाधित राहील याकडे लक्ष द्यावे लागते.इथे मात्र गाभ्यालाच धक्का लागला आहे. भारताची राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी अशी राज्यघटना आहे यामध्ये प्रत्येक बाबतीत नियम ठरवलेले आहेत आणि हे नियम ठरवताना घटनाकारांनीत्याचा व्यापक अभ्यास केला होता त्यामुळे अर्थातच नागरिकत्वासंबंधीदेखील तरतुदी भारताच्या घटनेमध्ये स्पष्ट आहेत. अर्थात नागरिकत्व दुरुस्ती कायद्यावर चर्चा करण्याआधी नागरिकत्व ही संकल्पना नक्की काय आहे हे माहित असणे गरजेचे ठरते. नागरिकत्व हे लोकशाही शासन व्यवस्थेचे पायाभूत तत्व मानले जाते. त्यात व्यक्तीचे शासनव्यवस्थेतील पूर्ण राजकीय सदस्यत्व, त्याची राज्यसंस्थेविषयी असलेली कायम स्वरूपी एकनिष्ठा समाविष्ट असते. नागरिक म्हणजे राज्यसंस्थेचा सदस्य होय आणि राज्यसंस्थेचे सदस्यत्व म्हणजेच नागरिकत्व होय.राज्यसंस्थेचा सदस्य असल्यामुळे साहजिकच नागरिकांना विविध नागरी व राजकीय अधिकार प्राप्त होतात त्याचप्रमाणे देशातील राज्यकारभारात सहभागी होण्याचा तसेच आपल्या सामाजिक व राजकीय जीवनात बदल घडवून आणण्याचा अधिकार मिळतो. भारतीय नागरिकत्वासंबंधी राज्यघटनेमधील दुसऱ्या भागातील कलम ५ ते ११ यामध्ये तरतुदी स्पष्ट केल्या आहेत.भारतीय राज्यघटनेचा स्वीकार केल्यापासून कलम ५ ते ९ अमलात आले तर कलम १०**

Copyright © 2020 Authors 

आणि ११ या दोन कलमांचा अंमल २६ जानेवारी १९५० पासून सुरु झाला. कलम ११ अंतर्गत संसदेला असलेल्या अधिकाराच्या आधारे संसदेने 'नागरिकत्व कायदा, १९५५'संमत केला. या कायद्यामध्ये राज्यघटना स्वीकारल्यानंतर नागरिकत्व प्राप्त करण्याच्या आणि समाप्त करण्याच्या तरतूदी स्पष्ट केल्या आहेत.नागरिकत्व कायदा १९५५ या मध्ये आत्ता पर्यंत ५ वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे त्या म्हणजे १९८६, १९९२, २००३ आणि २००५, २०१५.नागरिकत्व कायदा, १९५५ नुसार बेकायदेशीर स्थलांतरीत झालेल्यांना नागरिकत्व मिळू शकणार नाही असे बेकायदेशीर लोक म्हणजे जे भारतात विना परवाना, विना व्हिसा, विना पासपोर्ट, विना वैध कागदपत्रांशिवाय प्रवेश केला आहे आणि जास्त काळ भारतातच राहिले आहे. तसेच १९५५ च्या नागरिकत्व कायदयामध्ये नागरिकत्व देण्याबाबतीत धर्म हा निकष लावण्यात आला नव्हता आणि भारतीय नागरिकत्व सर्व धर्मीयांसाठीखुले आहे; मात्र या नव्या कायद्यानुसार पुढील महत्वाचे बदल करण्यात येणार आहेत ते म्हणजे १.पाकिस्तान, बांग्लादेश,अफगाणिस्तान या तीन मुस्लिमबहुल राष्ट्रांमधीलहिंदू, शीख, ख्रिश्चन, पारशी,बौद्ध, जैन या सहा धर्मियांना भारताचे नागरिकत्व मिळणार.२. या कायद्यानुसार निर्वासितांना नागरिकत्व मिळाल्यानंतर त्यांच्यावर बेकायदेशीर स्तलांतरित म्हणून दाखल झालेले खटले किंवा नागरिकत्वासंबंधीचे दाखल झालेले खटले मागे घेण्यात येतील. ३. जुन्या कायद्यानुसार नागरिकत्व मागणाऱ्या व्यक्तीचे भारतातील वास्तव्य सलग एक वर्ष आणि मागील १४ वर्षांपैकी किमान ११ वर्ष गरजेचे होते आता ही मुदत ५ वर्ष करण्यात आली आहे. ४.भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असणाऱ्या आसाम, मेघालय,मिझोराम आणि त्रिपुरा या राज्यांमधील आदिवासी क्षेत्रांना तसेच 'इनरलाईन परमिट'लागू असलेल्या अरुणाचल प्रदेश,नागालँड,मिझोरमआणि मणिपूरया राज्यांतील प्रतिबंधित क्षेत्रांना हा कायदा लागू होणार नाही. अर्थात निर्वासित व्यक्तींना या प्रदेशात जाता येईल परंतु त्या ठिकाणी वास्तव्य मात्र करता येणार नाही.अशा तरतुदी नागरिकत्व दुरुस्ती कायदा, २०१९ मध्ये करण्यात आल्या आहेत.या कायद्यात यानव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या तरतूदींमुळे संपूर्ण भारतात जनप्रक्षोभ उसळला.त्याचप्रमाणे आसाममधील राष्ट्रीय नागरिक नोंदणीची (National Register of Citizenship-NRC) आकडेवारी ३१ ऑगस्ट २०१९ रोजी जाहीर झाली आणि ही प्रक्रिया संपूर्ण देशात राबविणार असल्याची घोषणा केंद्र सरकारने केली.या NRC आणि CAA मुळे संपूर्ण भारत जागा झाल्याचे जाणवले. आता थोडक्यात NRC म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे तर 'राष्ट्रीय नागरिक नोंदणी (NRC)' म्हणजे देशाचे नागरिक कोण आहेत आणि कोण नाहीत, याची नोंद असणारे रजिस्टर किंवा नोंदवही होय. NRCची प्रक्रिया सर्व प्रथम आसाम या राज्यात राबविण्यात आली आहे.१९५१ च्या जनगणनेनंतर आसाममध्ये NRCचे काम हाती घेण्यात आले आणि त्यात आसाम राज्यातील रहिवाशांची नोंदणी करण्यात आली आणि याच भागात निर्वासितांचा प्रश्न गंभीर आहे कारण पूर्व पाकिस्तानातून म्हणजे अत्ताचा बांगलादेश यातून आलेले निर्वासित याच प्रदेशात मोठ्या प्रमाणात आहेत; आणि म्हणूनच नागरिकत्व दुरुस्तीचा मुद्दा पुढे आल्यापासून आणि त्याचबरोबर आसाममध्येनागरिक पडताळणी झाल्यापासून ईशान्येच्या सप्तभगिनी(सेव्हन सिस्टर्स) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा या सात राज्यात खदखद होती. आसाममध्ये याचे पडसाद जास्त उमटल्याचे दिसतात कारण आसाममध्ये NRC ची प्रक्रिया राबविली गेली आहे त्याच प्रमाणे निर्वासितांचे प्रमाण जास्त आहे आणि वाढत्या लोकसंख्येमुळे आसाममधील मूळ रहिवाशांमध्ये भाषा, संस्कृती याबाबतीत असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे आणि त्यातूनच हा मुद्दा राजकीय बनला आहे. आसामी अस्मिता टिकवण्यासाठी १९७६ मध्ये या राज्यात तीव्र आंदोलन सुरु झाले होते.या आंदोलनात 'ऑल आसाम स्टुडंट युनियन'(आसू) या संघटनेद्वारे अनेक तरुण आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.(आसू ही संघटना सुरवातीला 'असोम छात्र संमेलन' या नावाने कार्यरत होती. त्यामध्ये १९४० साली फूट पडली आणि १९६७ साली तेच दोन गट पुन्हा एकत्र आले आणि त्यांनी १९६७ मध्ये 'ऑल आसाम स्टुडंट युनियन' आसू हे नाव स्वीकारले.)आसाममधील तत्कालीन हिंसक परिस्थिती लक्षात घेऊन आंदोलक व केंद्र सरकार यांच्यामध्ये चर्चेअंती १५ ऑगस्ट १९८५ मध्ये 'आसाम करार' झाला. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी आणि आंदोलकांचे नेते प्रफुल्लकुमार महंत,भृगू कुमार फूकन आणि बिराज कुमार शर्मा यांनी या करारावर सह्या केल्या होत्या.अशा प्रकारे आसामची ही खूप जुनी असलेली जखम त्याची खपली पडल्यामुळेच तेथे कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. ईशान्येकडील राज्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे कारण त्याला राजकारण्यांकडून हिंदू विरुद्ध मुस्लिम असा रंग दिला जात आहे ईशान्य भारत सोडून उर्वरित भारतातील नागरिकदेखील या भूलथापांना बळी पडत आहेत; परंतु इथे लक्षात घेण्यासारखा मुद्दा म्हणजे स्थानिक आणि भारतीय (इंडीजीनस अँड इंडियन्स) यातील फरक. ईशान्येकडीलराज्यांमध्ये सगळ्यात जास्त महत्व असते ते स्थानिक असण्याला कारण तेथील नागरिकांच्या दृष्टीने "प्रत्येक स्थानिक भारतीय असेल किंवा नसेल पण

प्रत्येक भारतीय हा स्थानिक असेलच असे नाही" आणि हीच बाब त्या प्रदेशांचे वास्तव समजून घेण्यासाठी महत्वाची ठरते कारण या परिसरात जवळपास २३८ जमाती आहेत आणि या जमाती आपापल्या वांशिकतेबाबत कमालीच्या संवेदनशील आहेत त्यांच्यासाठी वांशिकत्व महत्वाचे आहे. हिंदू किवा मुस्लिम नाही. या राज्यांमधील बहुसंख्य हे तिबेटी-बर्मा, खासी-जैंतिया, मोन-खेमार वंशीय आहेत त्यातूनच अनेक उपजाती, जमाती तयार झाल्या आहेत त्यांचे एकमेकांशी सबंध सौदाहर्याचे असले तरी प्रचंड कडवे आहेत ते आपल्या प्रदेशात अन्य कोण्या जमातीच्या इसमांना येऊ देण्यास तितके उत्सुक नसतात. यातील दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे हे सर्व मुसलमान नाहीत. यातील बहुसंख्य हे हिंदू आहेत. बांगलादेशातील स्थलांतरित किवा बिहार इत्यादी राज्यातून गेलेले कष्टकरी आहेत पण तरीही तेथील सर्व स्थानिक आणि बाहेरून आलेले हिंदू यांचे संबंध सलोख्याचे नाहीत त्यामुळेच यातील बऱ्याच परिसरात 'इनर-परमिट' पद्धत राबविली जाते. हे परमिट म्हणजे त्या परिसरात जाण्याचा परवाना. ही पद्धत अन्य प्रदेशातून तेथे येणाऱ्या भारतीयांसाठी आहे तेथेच वास्तव्यास असणाऱ्यांना नाही. नव्या नागरिकत्व कायद्याचा संबंध याच मुद्द्याशी आहे वर सांगितल्याप्रमाणे आधी बांगलादेश युद्ध नंतर आसाम करार यामुळे आधीच या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात बांगलादेशी स्थिरावले आहेत आणि हे प्राधान्याने हिंदू आहेत आणि वर म्हटल्याप्रमाणे आसाममध्ये हा प्रश्न अधिक गंभीर आहे कारण हे घुसखोर पहिल्यांदा घर करतात ते आसाममध्ये आणि म्हणूनच आसामी नागरिकांचा विरोध आहे तो सर्वच घुसखोरांना. (घुसखोरी हा शब्दप्रयोग ब्रिटीश अधिकारी सी.एस.मुल्लान यांनी १९३१ मध्ये वापरला होता)आसाम राज्यात ब्रिटिशांच्या काळातच पहिले मोठे स्थलांतर घडविले गेले होते. विविध कामांसाठी म्हणून ब्रिटिशांनी शेजारच्या बंगालमधून,आजच्या बिहारमधून मोठ्या प्रमाणात मजुरांना आसाममध्ये नेले होते आणि हे सर्व तेव्हापासून आसाममध्ये स्थायिक झाले होते. हे सर्व झाले ईशान्य भारताबाबतीत आणि विशेषतःआसामच्या बाबतीत. आता या नागरिकत्व कायद्याला जो संपूर्ण भारतातून विरोध होत आहे त्याची कारणे पाहणे अगत्याचे ठरेल. एक म्हणजे या नागरिकत्व दुरुस्ती कायद्याद्वारे सरकार पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या तीनच राष्ट्रांमधील फक्त सहाच धर्मियांना नागरिकत्व देऊ इच्छिते; त्याचे कारण सरकारकडून असे सांगण्यात येते की या सहा धर्मियांवर अत्त्याचार झाले आहेत. मग प्रश्न निर्माण होतो तो हा की फक्त या तीन देशांमधेच या सहाच अल्पसंख्याकांवर अत्याचार होतात का? अल्पसंख्याकांच्या विरोधातील कारवाया आणि आपल्या माणुसकीचे प्रदर्शन करण्यासाठी हे तीनच देश का? त्यांच्या निवडीबाबत कोणते निकष सरकारने लावले?पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान यांची निवड करताना भौगोलिक सलगता हा मुद्दा असेल तर अफगाणिस्तानचे काय? कारण बांगलादेश, पाकिस्तान आपल्याला खेटून आहे म्हणून त्यांचा समावेश ठीक आहे पण पलीकडचा अफगाणिस्तान कशासाठी? आणि अफगाणिस्तानचा समावेश करायचा तर शेजारील श्रीलंकेचा, भारताच्या ईशान्येकडील भागाला लागून असलेल्या म्यानमारचा तसेच चीनचा समावेश का नाही? श्रीलंका, चीन या देशांमध्ये देखील अल्पसंख्याकांवर अत्याचार होत असतो मग अशा वेळी मानवतावादी दृष्टीकोन कुठे जातो? कारण आपल्या शेजारील श्रीलंका हा देश बौद्ध धर्मीय आहे आणि त्या देशातील तमिळ हे वेळोवेळी तेथील सरकारच्या दमनशाहीला बळी पडले आहेतच की आणि हे असे असताना त्यांना सोयीस्करपणे वेगळे करण्याचे कारण काय? आणि सरकार जर खरच मानवतावादी दृष्टीकोनातून विचार करत असेल तर हा मानवतावाद संपूर्ण मानवजातीसाठी असला पाहिजे कारण पाकिस्तानातील अहमदिया पंथीय मुसलमानांवर सातत्याने अत्त्याचार होत असतो तिथे कोणतेही सरकार असले तरी मग अशावेळी सरकारची मानवता या अहमदिया पंथीयांबद्दल का दिसत नाही त्याच प्रमाणे चीनमध्ये देखील विगुर (उद्युर)अल्पसंख्याकांवर अत्याचार सुरु आहे मग इथेपण सरकारचा मानवतावादी दृष्टीकोन दिसत नाही आणि त्यामुळेच अत्याचार, हिंसा कोणत्या धर्मियांवर होते त्यावर सरकारची मानवता दिसून येणार का ? त्यानंतर दुसरा मुद्दा येतो तो समानतेच्या तत्वाचा कारण भारताची राज्यसंस्था धर्माच्या आधारावर आपल्या नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही असे स्पष्टपणे भारताच्या राज्यघटनेतील कलम १५ मध्ये सांगितले आहे त्याच प्रमाणे राज्यघटनेतील कलम १४ कायद्यासमोर समानतेची हमी देते आणि हे तत्व केवळ भारतीयांनाच नाही तर इतर राष्ट्रातील नागरिकांनादेखील लागू होते. त्यामुळे थोडक्यात काय तर भारताची राज्यसंस्थाव्यक्तीव्यक्तींमध्ये भेदभाव करणार नाही आणि कायद्यासमोर सर्वांना समान वागणूक देइल. त्यानंतर तिसरा मुद्दा आहे धर्मनिरपेक्षतेचा. भारताने धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्वीकारले आहे आणि या तत्वानुसार भारताचा कोणताही विशिष्ट धर्म असणार नाही त्यामुळे भारत हे राष्ट्र धर्मनिरपेक्ष असे राष्ट्र असेल परंतु नागरिकत्व दुरुस्ती आणि नागरिकत्व पडताळणी या दोन्ही गोष्टी धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला छेद देणाऱ्या आहेत कारण या विधेयकाचा तटस्थपणे विचार केल्यास सरकारचा मानवतावादी दृष्टीकोन कुठेच दिसून येत नाही तर उलट सरकार धार्मिक दुभंगता निर्माण करण्याचे धोरण राबवीत आहे की काय अशी शंका निर्माण होत आहे कारण या

Copyright © 2020 Authors

विधेयकाचे एकमेव उद्दिष्टच जणू मुसलमान निर्वासितांना वेगळे काढणे आणि याचा निकष काय तर फक्त धर्म हाच आहे.चौथा मुद्दा येतो तो म्हणजे सर्वांना पडलेला प्रश्न की मुस्लिम धर्माचा समावेश या अल्पसंख्याकांमध्ये का करण्यात आला नाही तर या बाबतीत सरकारचे स्पष्टीकरण असे की पाकिस्तान,बांग्लादेश,अफगाणिस्तान या तीनही देशांनी त्यांच्या राज्यघटनेमध्ये स्वतःला मुस्लिम धर्मीय देश म्हणून घोषित केले आहेत आणि म्हणून त्या देशातील मुसलमानांवर अत्याचार होऊ शकत नाही. तसेच या तीनही देशांच्या लोकांपैकी ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोक मुस्लिम आहेत आणि म्हणूनया धर्माला या विधेयकात स्थान देण्यात आले नाही. भारताच्या राज्यघटनेने जर धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केला असेल तर हा धार्मिक भेदभाव करण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला असा प्रश्न पडतोच की कारण देशाच्या राज्यघटनेचे पालन करायची जबाबदारी देशाच्या सरकारवरही आहे मग ते सरकार कोणतेही असो . या कायद्याला विरोध होण्याचे पाचवे कारण म्हणजे या कायद्यामुळे आसाम कराराचा भंग होत आहे कारण आसाम करारामध्ये बेकायदेशीर नागरिक कोण याबाबतची तारीख होती २५ मार्च १९७१ आणि आता ती बदलून ३१ डिसेंबर २०१४ केली आहे आणि आसाम कराराच्या आधारे बेकायदा ठरविल्या गेलेल्या निर्वासितांवर न्यायालयात जर खटले सुरु असतील तर संबंधिताना नागरिकत्व मिळाल्यानंतर हे खटले साहजिकच रद्द होतील. ते भारताचे नागरिक झाल्यावर त्यांना देशाबाहेर त्यांच्या मूळ ठिकाणी परत पाठविण्याचा प्रश्नच येत नाही.सहावा मुद्दा आहे आंतरराष्ट्रीय संकेताच्या बाबतीतला भारत हा संयुक्त राष्ट्रसंघटनेचा सदस्य आहे आणि युनोच्या सनदेवर भारताने स्वाक्षरी केलेली आहे. त्यातील पहिल्याच कलमामध्ये 'वंश, लिंग, भाषा व धर्म या आधारावर भेदभाव न करता मानवी हक्कांना आणि मुलभूत स्वातंत्र्याला प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करणे आणि कोणत्याही भेदभावास थारा न देणे' हे महत्वपूर्ण उद्दिष्ट समाविष्ट करण्यात आले आहे आणि केंद्र सरकारने या कायद्याच्या माध्यमातून या उद्दिष्टाचेच उल्लंघन केले आहे असा आक्षेप घेतला जात आहे. त्याचप्रमाणे 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा,१९४८ मधील कलम एक मध्ये 'सर्व मानव जन्मताच स्वतंत्र असून ते प्रतिष्ठा व हक्कांबाबत समान आहेत' तर कलम दोन नुसार 'प्रत्येकाला सर्व मानवी हक्क आणि स्वातंत्र्ये कोणत्याही भेदभावाशिवाय उपलब्ध असतील'आणि नेमका CAA मुळे वरील दोन्ही कलमांना डावलले जात आहे. सातवा मुद्दा असा आहे पाकिस्तान, बांगलादेशआणि अफगाणिस्तान या देशातून विस्थापित झलेल्या मुस्लीमेत्तर नागरिकांना नागरिकत्व देण्याची तरतूद या कायद्यात आहे, परंतु उर्वरित मुस्लिम निर्वासितांबाबत कोणतीही धोरणात्मक स्पष्टता नाही. अशा प्रकारे वरील सात मुद्यांवरून या CAA ला संपूर्ण देशभरातून विरोध होताना दिसत आहे. त्याचप्रमाणे लोकांचा विरोध राष्ट्रीय नागरिकता रजिस्टर लादेखील आहे कारण आसाममधील निर्वासितांना याबाबतीत जे हाल सहन करावे लागले तेच भारतातील मुस्लीम,आदिवासी समाजाला भोगावे लागतील कारण त्यांच्याजवळ त्यांची नागरिकता सिद्ध करणारी कागदपत्रे असतीलच याची खात्री नाही.

हे विधेयक संसदेमध्ये पास झाल्यानंतर केरळ, पंजाब, पश्चिमबंगाल, मध्य प्रदेश, बिहार, आणि ईशान्येकडील राज्यांनी CAA ला आणि NRC ला विरोध दर्शवून हा कायदा घटनेच्या विरोधी असल्याचा सूर आवळला व त्याची अंमलबजावणी करण्यास नकार दिला; परंतु सध्याचेसरकार संघाच्या पुरातन धेय्यधोरणाला पूर्ण करण्याचे काम करत असल्याचे दिसत आहे कारण मोदी सरकारच्या दुसऱ्या कारकीर्दीमध्ये आर्थिक सुधारणा लागू केल्या जातील अशी अपेक्षा होती परंतु इथे मात्र हिंदुत्वाचेच राजकारण दिसत आहे कारण भाजप आणि इतर पक्ष यांच्यातील महत्वपूर्ण फरक म्हणजे हिंदुत्वाचा आणि हे जगजाहीर आहे आणि हिंदुत्ववादी विचारसरणी देशावर लादण्याचे पूर्ण प्रयत्न या ठिकाणी दिसून येत आहे उदा: राममंदिराचा मुद्दा, समान नागरी कायद्याचा आग्रह, काश्मीर मधून ३७० हटविणे, तिहेरी तलाख कायदा,शबरीमलाच्या मंदिरात महिलांना प्रवेशबंदीला साथ हे सगळे हिंदुत्ववादी राजकारणाचीच उदाहरणे आहेत आणि फक्त हिंदुत्वाचा प्रसार करून काही होत नाही तर त्यासाठी ठोस कृती करणे देखील आवश्यक आहेत हे संघाच्या तालमीत तयार झालेले शहा जाणून आहेत परंतु या मध्ये अडचणीचा भाग असा असतो तो म्हणजे हिंदुत्व टिकवून ठेवायचे असेल तर सतत नवे नवे मुद्दे शोधून काढावे लागतात त्यामुळेच सध्या भाजपच्या अजेंड्यावर नागरिकत्व नोंदणी मोहीम आणि नागरिकत्व सुधारणा कायदा हे नवे मुद्दे आहेत,आसाममध्ये जेव्हा नागरिकत्व नोंदणीची मोहीम राबविली गेली होती ती असेच घुसखोर शोधण्यासाठी परंतु त्यावेळी त्याचा फार काही उपयोग झाला नाही कारण नागरिकत्व नोंदणीतून जी आकडेवारी बाहेर आली होती ती भ्रमनिरास करणारी होती कारण घुसखोर आपेक्षे एवढे सापडलेच नाही त्यांच्यात हिंदूंची आकडेवाडी अधिक निघाली आणि म्हणूनच मग राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी पाठोपाठ नागरिकत्व सुधारणा विधेयक आणले गेले. आता आसाम मधील लाखो हिंदुना या कायद्याच्या आधारावर नागरिकत्व देता येईल आणि त्याबरोबर ईशान्येकडील राज्यांमध्ये एक हिंदू मतपेढी तयार केली जाईल एवढे मात्र नक्की आणि म्हणूनच राजकीय संवेदनशीलतेच्या नावाखाली नव्या

Copyright © 2020 Authors 

विधेयकात ज्या भागात 'इनर परमिट' किंवा 'प्रवेशासाठी अंतर्गत परवाना' घ्यावा लागतो तिथे त्यातल्या तरतुदी लागू होणार नाही याचा उल्लेख वर आलेलाच आहे. मणिपूर, अरुणाचल प्रदेश, नागालँडच्या काही भागातजाण्यासाठी असा परवाना घ्यावा लागतो. या तिनही राज्यांमध्ये विधेयकातील सुधारणा लागू होणार नाहीत या ठिकाणी आणखीन एक मुद्दा असा तो म्हणजे ईशान्येतल्या अनेक राज्यांमध्येसहाव्या शेड्यूलनुसार स्वायत्त प्रशासकीय जिल्हे तयार करण्यात आले आहेत त्यांना स्वतंत्र अधिकार आहेत, ते प्रामुख्याने आदिवासींचे हितरक्षण आणि त्याच्या जीवन पद्धतीचा सन्मान करण्यासाठी आहेत म्हणजेच नागरिकत्व विधेयक बहुतांश ईशान्य भारताला लागू होणार नाही आणि त्यामुळे या राजकीय खेळी बाबतीत इथे एक मुद्दा तयार होतो तो म्हणजे एक देश एक कायदा असे पालुपद लावणारे महत्वाचे नागरिकत्व सुधारणा विधेयक ईशान्य भारतात लागू करण्यासाठी का कचरतात? हे वेगळेपण का खपवून घेतले जाते? हे जर ईशान्य भारतातल्या संस्कृतीच्या जपवणूकीसाठी, वेगळेपणाच्या हमीसाठी असेल तर काश्मिरातील ३७० कलमासाठी कोणती वेगळी कारणे होती? जम्मूकाश्मीर या राज्यासाठी ३७० कलम लावून विशेष दर्जा दिल्याबद्दल पंडित नेहरुंनादोष देणारे सरकार या ईशान्येकडील राज्यांसाठी विशेष व्यवस्था कशी काय करू शकते? अर्थात आसाममध्ये मध्ये नागरिकत्व नोंदणी प्रक्रियेचा जो विचका झाला त्या अनुभवातून सरकारने हे पाउल उचलले असेल असे म्हणता येईल या तडजोडीमुळेभाजपचा धोरणात्मक आणि वैचारिक दुट्टपीपणा दिसून येतो.

या विधेयकाचा वापर करून भाजप आपली पोळी भाजत असल्याचे दिसून येत आहे कारण संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका महत्वाची समजली जाते कारण विरोधी पक्ष जेवढा मजबूत तेवढी लोकशाही व्यवस्था मजबूत पण सध्या विरोधी पक्षाचे स्थान नाममात्र राहील्यामुळे विरोधकांची अडचण अशी झाली आहे की देशाच्या मूल्यांच्या विसंगत चालीला मान्यता देऊ शकत नाही आणि देशाची वाटचाल बदलणाऱ्या मूल्यांना पाठींबा दिला तरी लाभ भाजपलाच होणार आहे कारण ईशान्य भारतातील बऱ्याच भागात विधेयक लागू न केल्यास दुट्टप्पीपणाची टीका झाली तरी तिथले राजकारण कुठेतरी हिंदू मतपेढीद्वारे साधले जाऊ शकते. उरलेल्या भारतात मुस्लिमबहुल देशातून आलेल्या तिथल्या अल्पसंख्याकांच्या यात प्राधान्याने हिंदुंच्या हिताचे रक्षण करतो अशी हिंदू रक्षकाची भूमिका घेता येते आणि याला विरोध करणाऱ्यांना मुस्लिमधार्जीण ठरवून हिंदू विरोधी सहज ठरवता येते. धर्माच्या आधारावर वेगवेगळी वागणूक देता येते हे एकदा प्रस्थापित झाले की हीच पद्धत शांतपणे अनेक ठिकाणी वापरली जाऊ शकते. तसे पाहिले तर देशाच्या आर्थिक आघाडीवर सरकारचे डोके चालणे बंद पडले आहे अशी आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती सद्या निर्माण झाली आहे त्यामुळे सरकारच्या भात्यात धार्मिक दुभंग हे एकमेव अस्त्र राहीले आहे आणि त्याचाच वापर सरकार या ठिकाणी करत आहे.

शेवटी इथे मुद्दा एका कायद्यापुरता नसून धर्मनिरपेक्षतेच्या व समतेच्या तत्वाला डावलण्याचा आहे. शेवटी आजचे सरकार ज्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा सतत उदो उदो करताना दिसत आहे त्यांनीच १९४६ साली घटना समितीत बोलताना म्हण्टले होते, "नागरिकत्वासाठीच्या तरतुदींची छाननी जगभर होत आहे हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. आपण काय करतो यावर त्यांच (जगाचे ) लक्ष असेल. आज त्याप्रमाणेच या कायद्याचे पडसाद संपूर्ण जगात उमटू लागले आहेत ते पुढीलप्रमाणे पाकिस्तानने या कायद्याला विरोध दर्शवित हा कायदा मुस्लीम समुदायावर अन्याय करणारा असून धार्मिक द्दविकरण करणारा असल्याचा आरोप केला आहे तर बांगलादेश सरकारने NRC हा भारताचा अंतर्गतप्रश्न असल्याचे म्हण्टले आहे मात्र CAAची आवश्यकता नव्हती असेही मत व्यक्त केले आहे. इकडे अफगाणिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई यांनीदेखील CAAबद्दल नाराजीचा सूर आवळला आहे त्यांच्या मते अफगाणिस्तानमध्ये युद्धजन्य परिस्थिती असून इथे अल्पसंख्याकांसोबत सर्वांचाच छळ होतो आहे त्यामुळे भारताने अफगाणिस्तानच्या सर्वच नागरिकांना समान वागणूक द्यावी.त्याचप्रमाणे कोणतेही परकीय उद्योगधंदे असो किंवा कंपन्या मोठी गुंतवणूक करायला एखाद्या देशात येताना त्या भू-राजकीय अनुकूलतेचा जसा विचार करतात, त्याचप्रमाणे त्या देशातील राजकीय व्यवस्था मग ती लोकशाही आहे की हुकुमशाही, त्याचप्रमाणे तेथील उदारमतवादी धोरणे यांचा देखील विचार करतात . जर CAA च्या विरोधात अशीच आंदोलने आणि निदर्शने चालू राहिली तर देशाच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेला धोका पोहोचू शकतो. तर दुसरीकडे अमेरिकी सरकारने अजून तरी भारत विरोधी वक्तव्य केलेले नसले तरी अमेरिकी काँग्रेसमधील सदस्यांनी कलम ३७०, ३५ अ तसेच CAA ला विरोध दर्शविला होता परिणामी, भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांची अमेरिकी काँग्रेसच्या शिष्टमंडळाशी पूर्वनियोजित बैठक या शिष्टमंडळाने रद्द केली. त्याच प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक स्वातंत्र्यासाठी काम करणाऱ्या (US Commission for International Religious Freedom – USCIRF) अमेरिकी आयोगाने CAAवर आक्षेप नोंदवला

आहे आणि हा कायदा म्हणजे धोकादायक पाउल असून या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले तर अमित शहा यांच्यावर देशाचे गृहमंत्री या नात्याने निर्बंध घालण्याची मागणी केली आहे . त्याचबरोबर मुस्लिम राष्ट्रांसोबतचे संबंध बिघडण्याची तसेच या राष्ट्रांच्या मनात भारताविषयी अविश्वास तयार होण्याची शक्यता आहे. त्याहीपेक्षा सर्वात महत्वाची बाब म्हणजे असे म्हण्टले जाते की २०१९ हे वर्ष भारतासाठी राजकीय उलथापालठीचे ठरले आहे. केंद्रातील भाजप सरकारने काश्मीरमधून ३७० कलम हटविले, सुधारित नागरिकत्व कायदा लागू केला या निर्णयांचे पडसाद संपूर्ण जगात उमटले असून CAA मुळे देशामध्ये भेदभाव निर्माण केला असून त्याचा परिणाम भारतीय लोकशाही व्यवस्थेवर झाला आहे. 'द इकोनॉमिस्ट' ने लोकशाही निर्देशांक २००६ मध्ये जाहीर करण्यास सुरुवात केली होती तेव्हापासून आत्तापर्यंतच्या १३ वर्षातील सर्वात कमी निच्चांक भारताचा लोकशाहीबाबत लागला आहे. तो म्हणजे जागतिक लोकशाही निर्देशांकात२०१९ मध्ये भारताचा गुणांक ६.९ होता. त्यामुळे संपूर्ण लोकशाही पद्धत आमलात आणणारा देश म्हणून भारताकडे पाहिले जात असले तरी लोकशाही निर्देशांकात भारताचे स्थान घसरले आहे या यादीत भारताचा क्रमांक ५१ वा लागला आहे. आज आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये भारताची प्रतिमा डळमळीत होत आहे याकडे सत्ताधारी वर्गाचे लक्ष नाही त्याच प्रमाणे देशातील महत्वाचे प्रश्न अनुत्तीर्णच राहीले आहेही शोकांतिका आहे.त्याहूनही धर्मावरून पुन्हा एकदा देशात फूट पाडली जात आहे यासारखे दुसरे दुर्दव नाही.शेवटी जाता जाता एक महत्वाचे भाषा किवा वंशिकत्व हे मुद्दे धर्माला पुरून उरतात त्यामुळे सत्ताधार्यांनी सत्तेसाठी धर्माचा वापर कितीकाळ करायचा हे ठरवले पाहिजे नाहीतर देशातील जनता कासवाच्या गतीने का होईना सत्ताधारी वर्गाला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र निश्चित.

**संदर्भ सूची :**

1. भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध खंड १ भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया:- तुकाराम जाधव, महेश शिरपूरकर
2. भारताचे संविधान, मिलिंद प्रकाशन, वर्धा
3. सकाळ सप्तरंग लेख
4. सकाळ अग्रलेख, लेख
5. महाराष्ट्र टाईम्स अग्रलेख, लेख
6. Indian Polity (Fourth Edition) For Civil Services Examination – M. Laxmikant
7. बुलेटीन ऑफ युनिक ॲकॅडमी, पुणे. वर्ष ६. अंक ११. फेब्रुवारी २०२०

❑❑❑

# काश्मीर प्रश्न आणि कलम 370

**प्रा. मिलिंद खांदवे**

**राज्यशास्त्र विभाग,**

**इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे**

**इमेल** : milindkhandave007@gmail.com

Mob : 9850436057

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देश ब्रिटिश वसाहतीतून मूक्त झाला. भारताला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य अशी भारत देशाची नवी ओळख निर्माण झाली. त्यावेळेस भारतात 550 पेक्षा अधिक संस्थाने होती. तेथील राजे या संस्थानांचे मालक होते. भारतात 1947 रोजी हंगामी सरकार स्थापन झाले. पंडित नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात सरदार पटेल गृहमंत्री म्हणून काम करत होते. सर्व संस्थानांचे विलीनीकरण भारतात करायचे असा त्यावेळेस सरकारने निर्णय घेतला. गृहमंत्री सरदार पटेल यांनी संस्थाने विलीनीकरणाची जबाबदारी आपल्या कडे घेतली. त्यानुसार त्यांनी संस्थानिकांच्या सर्व राजे महराजांना पत्र पाठवून विनाअट भारतात समाविष्ट होण्याची विनंती केली. त्या विनंतीला मान देऊन सर्व महाराजांनी भारतात सामिल होण्याचा निर्णय घेतला. याला अपवाद फक्त जुनागढ, हैदराबाद व जम्मू काश्मीर या संस्थानांचा होता. नंतर त्यातील जुनागढ संस्थान पाकिस्तानात सामिल झाले. हैदराबाद संस्थानावर लष्करी कारवाई करून पटेल यांनी ते भारतात सामिल करून घेतले. राहिला फक्त प्रश्न जम्मू आणि काश्मीर या संस्थानाचा?

जम्मू काश्मीर संस्थानाचा राजा हरिसिंह हे हिंदू होते व प्रजा बहुसंख्य मुस्लिम होती. हरिसिंह यांना आपले संस्थान भारतात किंवा पाकिस्तानात विलिन करायचे नव्हते त्यांना आपल्या राज्याचे अस्तित्व स्वतंत्र ठेवायचे होते. ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड माऊंट बॅटन यांनी राजा हरिसिंह यांची भेट घेऊन भारतात किंवा पाकिस्तानात तुमचे संस्थान विलीन करा असा सल्ला दिला. परंतु राजाने तो सल्ला मानला नाही व आपले अस्तित्व स्वतंत्र ठेवले. 26 ऑक्टोबर 1947 रोजी पाकिस्तानी लष्करी टोळयांनी बॅ जिना यांच्या आदेशानूसार जम्मु व काश्मीर या प्रांतावर हल्ला चढविला. त्यांना प्रत्युत्तर देण्याइतके सैन्य लष्करी सामुग्री राजा हरिसिंह यांच्याकडे नव्हती. जम्मू काश्मीरच्या 1/3 प्रदेशावर पाकिस्तानी टोळयांनी कब्जा चढविला होता व तो प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. राजा हरिसिंह यांनी रातोरात भारतात पलायन केले. त्यानी पंतप्रधान पंडित नेहरू, गृहमंत्री सरदार पटेल व गव्हर्नर जनरल माऊंट बॅटन यांची भेट घेतली. जम्मु काश्मीर हे संस्थान पाकिस्तानच्या कचाटयातून मुक्त करा अशी विनंती त्यांनी भारत सरकारकडे केली. गृहमंत्री सरदार पटेल यांनी काश्मीर संस्थान भारतात सामिल करा त्यांनतर आम्ही लष्करी कारवाई करू अशी अट त्यांच्यासमोर ठेवली. सरदार पटेल यांच्या वाक्याला पतंप्रधान नेहरू व लॉर्ड माऊंट बॅटन यानी पाठिंबा दर्शविला. राजा हरिसिंह यांच्यासमोर भारत सरकारने सामिलनाम्याचे करारपत्र (Instrument of Accession) ठेवले व त्यावर सही केली. त्यानंतर भारत सरकारने आपले सैन्य जम्मू काश्मीर मध्ये पाठविले. पाकिस्तानी सैन्याचा पराभव करण्यात आला व जवळपास 2/3काश्मीरचा भाग भारतीय सैनिकांनी आपल्याकडे ठेवला. उरलेला 1/3काश्मीर या भागावर पाकिस्तानने कब्जा मिळविला होता. त्याला आपण बळजबरीने बळकावलेला पाकव्याप्त काश्मीर असे म्हणतो.

भारताच्या संविधान सभेने दिनांक 27 मे 1949 रोजी जम्मू काश्मीरसाठी कलम 370ची विशेष तरतुद केली. काश्मीरचे त्यावेळेचे पंतप्रधान शेख अब्दुल्ला यांच्या विनंतीनुसार पंडित नेहरू यांचा कलम 370ला मोठा पाठिंबा होता. या कलमानुसार भारत सरकारने जम्मु काश्मीर या प्रदेशाला अधिक स्वायत्ता दिली. कारण काश्मिरी जनतेचे प्रेम भारत देशावर अधिक निर्माण झाले पाहिजे. हा प्रदेश येथून पुढच्या कालावधीत कधीही पाकिस्तानला जोडला जाऊ नये. हा उद्देश कलम 370 निर्माण करण्याच्या बाबतीत घटनाकारांचा होतो. जम्मू-काश्मीर या प्रांतास भारतीय घटनेशी फारकत घेण्याची मुभा दिली गेली. आणि या प्रांतावरील संसदेच्या अधिकारांवरही मर्यादा आणली गेली. यामुळे या प्रांतास अन्य राज्यांच्या तुलनेत विशेषाधिकार दिले गेले. परिणामी जम्मु-काश्मीर

Copyright © 2020 Authors 